# NEWS PAPER CLIPINGS

Name of News Paper : Pudhari

Dated: 17/3/2011

# ज्ञानसंपन्न होऊन राष्ट्राच्या विकासात योगदान द्या : डॉ. कलाम

**पिंपरी : प्रतिनिधी**

आजचा समाज ज्ञानाधिष्ठित झाला असून, कालच्या संकल्पना आज लागू पडत नाहीत.त्यामुळे काळाची गरज ओळखून ज्ञानसंपन्न होत राष्ट्राच्या विकासात योगदान द्या, असे आवाहन माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांनी युवा पिढीला केले.

डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाच्या दुसऱ्या पदवी प्रदान सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून ते उपस्थित होते. या वेळी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. त्रिपुराचे राज्यपाल. डॉ. डी. वाय. पाटील हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. या कार्यक्रमाला ज्येष्ठ संगणकतज्ज्ञ डॉ. विजय भटकर, एआयआयएमएसचे माजी अध्यक्ष डॉ. वेणुगोपाल, केंद्रीय नियोजन आयोगाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव, विशेष सरकारी वकील ॲड. उज्ज्वल निकम, विद्यापीठाचे कुलपती डॉ. पी. डी. पाटील, कुलगुरू डॉ. पी. एन. राजदान व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी डॉ. कलाम यांनी उपस्थित विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांच्याकडून यशाचे गमक वदवून घेत ते म्हणाले की, आजच्या युगात ज्ञान ही संपत्ती असून, अशी संपत्ती निर्माण करणाऱ्या संस्था या ज्ञानाच्या शक्तिस्थळांच्या रूपाने पुढे येत आहेत. युवकांनी कोणतीही गोष्ट करताना ती आत्मविश्वास व धाडसाने करावी. मी, आपण व भारत हे सर्व करू शकतो, असे मनात आणून पाहा. समोरची परिस्थिती नक्कीच बदलेल. जगात प्रत्येक गोष्टींला अमर्याद संधी आहेत. गरज आहे ती फक्त तुमच्या विचारांची. कोणतेही कार्य करताना त्या कार्याबद्दलच्या तुमच्या आशा कायम जिवंत ठेवा. काहीही झाले तरी आपल्या आशा संपुष्टात येऊ देऊ नका, असे त्यांनी उपस्थितांना आवाहन केले. या वेळी डॉ. कलाम यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत विद्यापीठाच्या शैक्षणिक कार्याचे कौतुक केले.

यावेळी डॉ. विजय भटकर व डॉ वेणुगोपाल यांना डॉक्टर ऑफ सायन्स, तर डॉ. नरेंद्र जाधव व ॲड. उज्ज्वल निकम यांना डॉ. कलाम यांच्या हस्ते डॉक्टर ऑफ लेटर्स या पदव्यांनी सन्मानित करण्यात आले.

> ॲड. उज्ज्वल निकम यांना डॉक्टरेट प्रदान केल्यानंतर या सत्काराला उत्तर देताना ते म्हणाले की, मी डॉक्टर व्हावे अशी माझ्या आईची खूप इच्छा होती; मात्र मी वडिलांमुळे वकिली व्यवसाय स्वीकारला. या डॉक्टरेट पदवीमुळे आता आईची इच्छादेखील मी पूर्ण करू शकलो, याचा मला अभिमान आहे, असे सांगत आता यापुढे माझी ओळख डॉ. उज्ज्वल निकम अशी असेल, असे ते म्हणाले.

यावेळी डॉ. डी. वाय. पाटील म्हणाले की, आयुष्यातील कोणतीही गोष्ट मनापासून करा, त्यामध्ये हमखास यश मिळते. या वेळी पी. डी. पाटील, डॉ. विजय भटकर, डॉ. वेणुगोपाल, डॉ. नरेंद्र जाधव यांनी मनोगत व्यक्त केले.

डॉ. पी. एन. राजदान यांनी विद्यापीठाच्या विशेष अहवालाचे वाचन केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# NEWS PAPER CLIPINGS

Name of News Paper : Pudhari

Dated: 17/3/2011




पिंपरी येथे डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाच्या द्वितीय पदवीप्रदान समारंभात माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या हस्ते आंतरराष्ट्रीय ख्यातीचे संगणकतज्ज्ञ डॉ. विजय भटकर, प्रसिद्ध हृदयशल्यचिकित्सक व 'एम्स'चे माजी संचालक डॉ. पी. वेणुगोपाल, केंद्रीय नियोजन समितीचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव, कायदेतज्ज्ञ व विशेष सरकारी वकील ॲड. उज्ज्वल निकम यांना डॉक्टरेट प्रदान करून गौरविण्यात आले. यावेळी त्रिपुराचे राज्यपाल डॉ. डी. वाय. पाटील, विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पी. एन. राजदान, विद्यापीठाचे कुलपती डॉ. पी. डी. पाटील उपस्थित होते. (छाया : यशवंत नामदे) वृत्त पान ६ वर

# NEWS PAPER CLIPINGS

Name of News Paper : Maharashtra Times

Dated: 17/3/2011

# कष्ट व ज्ञानातून ओळख निर्माण करा!

## डी. वाय. पाटील विद्यापीठ पदवीप्रदान समारंभात डॉ. कलाम यांचा कानमंत्र

म. टा. प्रतिनिधी ■ पिंपरी

'अपार कष्ट आणि अपग्रेड नॉलेज यामुळेच तुम्ही समाजात 'युनिक' म्हणून ओळखले जाल,' असा मंत्र माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांनी शुक्रवारी विद्यार्थ्यांना दिला. निमित्त होते पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठाच्या दुसऱ्या पदवीप्रदान समारंभाचे.

पिंपरीतील विद्यापीठाच्या प्रांगणात हा समारंभ झाला. डॉ. कलाम यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली. या वेळी ज्येष्ठ संगणकतज्ज्ञ डॉ. विजय भटकर आणि डॉ. पी. वेणूगोपाल यांना 'डॉक्टर ऑफ सायन्स'; तसेच केंद्रीय नियोजन आयोगाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव आणि विशेष सरकारी वकील उज्ज्वल निकम यांना 'डॉक्टर ऑफ लेटर्स'ने सन्मानित करण्यात आले. त्रिपुराचे राज यपाल डॉ. डी. वाय. पाटील, कुलपती डॉ. पी. डी. पाटील, कुलगुरू डॉ. पी. एन. राजदान या वेळी उपस्थित होते.

बदलते शैक्षणिक प्रवाह आणि विद्यार्थ्यांचा दृष्टिकोन यांचा उहापोह करताना कलाम म्हणाले, 'विद्यापीठातून बाहेर पडल्यावर मिळणारे ज्ञान हा तुमचा सगळ्यात जवळचा मित्र असेल. ते टिकवून ठेवण्यासाठी धैर्य, सर्जनशीलता या गोष्टी तुमच्याजवळ हव्यात. शिक्षणातून विचार करण्याची दृष्टी मिळते आणि तोच मार्ग ज्ञानापर्यंत जातो. त्यातून तुम्ही महान बनू शकता. तुमचे आई-वडील आणि प्राथमिक शिक्षक या तीन व्यक्तींना आयुष्यभर हृदयात मानाचे स्थान द्या. कारण या विश्वात पाऊल ठेवण्यासाठी त्यांनी तुम्हाला प्राथमिक धडे दिले आहेत. त्या विश्वासावर तुम्ही जग जिंकू शकता.'

'वेगळा विचार, संशोधन आणि अडचणीतून मार्ग काढणे यासाठी धैर्य आवश्यक आहेच. परंतु, त्याचबरोबर तुमच्यातील वेगळेपण तुम्हाला अधिक यश मिळवून देईल. त्यासाठी प्रत्येक तरुणाने अपार कष्ट आणि अद्ययावत माहिती मिळविण्याचा ध्यास बाळगला पाहिजे,' असे आवाहन कलाम यांनी केले.

### सुवर्णपदक विजेत्या विद्यार्थ्यांचा गौरव

विविध विषयांमध्ये सुवर्णपदक मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा डॉ. कलाम यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. यामध्ये सईद इमदाद हुसेन हाश्मी, सौमित्र चक्रवर्ती, मनप्रीत कौर, निखिल प्रभाकर बुरुटे, तन्वीरसिंग भुतानी, पूजा मोहनलाल जयसिंघानी, गोयल वरुण रामवतार, पूजा प्रिया, रमणदीप कौर, शांभवी शांक्रीत, प्रशांत कुमार, विशाखा सोनी, अखिलकुमार मिश्रा, कवेरीवाला झैनाब अजीजभाई, सीमा अनिल चव्हाण यांचा समावेश आहे.

# NEWS PAPER CLIPINGS

**Name of News Paper** : Kesri Pune Garjna

**Dated**: 19/3/2011

केसरी

# शैक्षणिक संस्था या ज्ञानाच्या ऊर्जास्रोत

## डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचे प्रतिपादन

पिंपरी :२१ व्या शतकात विश्व एक अनेक संधींनी युक्त ज्ञानाधारित समाज बनला आहे. काल ज्या तऱ्हेने काम केले ते आज उपयोगी नाही. शैक्षणिक संस्था ज्ञानाच्या उर्जा स्रोत आहेत असे मत माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम व्यक्त केले. पुण्याच्या डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाच्या द्वितीय पदवीदान समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

विद्यापीठाचे कुलपती डॉ. पी. डी. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या समारंभात विशेष अतिथी म्हणून सीडॅकचे माजी संचालक विजय भटकर, अलकेमिस्ट मेडिकल डिव्हीजनचे अध्यक्ष आणि एआयआयएमएसचे माजी संचालक डॉ. पी. वेणूगोपाल, भारत सरकारच्या नियोजन आयोगाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव, महाराष्ट्र सरकारचे विशेष सरकारी वकील उज्ज्वल निकम, कुलगुरू डॉ. पी. एन. राजदान, निबंधक डॉ. श्री. एस. माने उपस्थित होते.

या समारंभात डॉक्टर ऑफ सायन्स ही पदवी, डॉ. विजय भटकर आणि डॉ. पी. वेणूगोपाल यांना तसेच डॉक्टर ऑफ लेटर्स ही पदवी डॉ. नरेंद्र जाधव आणि उज्ज्वल निकम यांना प्रदान करण्यात आली.

डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम पुढे म्हणाले, आजचे युग स्पर्धेचे युग आहे जे संशोधनावर निर्भर आहे. विद्यापीठांनी एकच ध्येय ठेवावे शिक्षण-संशोधन-शिक्षण. शैक्षणिक संस्था या सृजनतेस अनुकूल आहेत, ज्या गरजेनुसार एकता आणि संवेदनशीलता निर्माण करून शकतात. शिक्षणात मूल्य निर्णय अत्यावश्यक आहे कारण आज मूल्यच डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आणि डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाच्या शिक्षण आणि संशोधन पद्धतीचे कौतुक केले.

डॉ. नरेंद्र जाधव डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाला, त्यांचा केलेला सन्मान आणि डॉक्टरेट दिल्याबद्दल धन्यवाद देत म्हणाले की; मी खूप खुश आहे कारण मला पहिल्यांदा एका प्रतिष्ठीत संस्थेकडून डॉक्टरेट प्राप्त झाली आहे. प्रत्येक व्यक्तीने ती काम करीत असलेल्या ठिकाणी उच्च स्थान मिळविण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

उज्ज्वल निकम हसत हसत म्हणाले की, माझ्या आईचे एक स्वप्न होते की मी मोठं झाल्यावर डॉक्टर व्हावं, पण मी नाही होऊ शकलो. मी खुश आहे कारण, आज पुण्याच्या डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाची डॉक्टरेट पदवी प्राप्त झाल्यामुळे माझ्या आईचे स्वप्न आज पुरे होणार आहे. आपल्या देशातील व्यवस्था पूर्णपणे भ्रष्ट झाली आहे आणि आपल्याला जर ती बदलायची असेल तर ते संसदेतून होणार नाही. त्यासाठी आजच्या युवकांनी पुढे येऊन या व्यवस्थेत बदल करण्यासाठी पाऊल उचलले पाहिजे. जर आपल्याला दहशदवाद आणि दहशतवादी संपवायचे असतील तर आपल्याला प्रथम या दहशतवाद्यांना मदत करण्यांना पकडावे लागेल तेव्हाच हा दशहतवाद आपल्या देशातून आणि जगातून संपेल.

कुलपती डॉ. पी. डी. पाटील यांनी पदवीदान समारंभात संबोधित केल्यानंतर डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, पुणे चे कुलगुरू डॉ. पी. एन. राजदान यांनी विद्यापीठाचा विशेष अहवाल सादर केला.



डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाच्या पदवीदान समारंभात डॉ. ए. पी. जे अब्दुल कलाम यांच्या हस्ते डॉ. विजय भटकर यांना डॉक्टर ऑफ सायन्स ही पदवी, प्रदान करण्यात आली

# NEWS PAPER CLIPINGS

Name of News Paper :.. Sakal ..............................

Dated:.... 17/3/2011 ..........



डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, पिंपरी : पदवीदान समारंभात माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा त्रिपुराचे राज्यपाल डॉ. डी. वाय. पाटील यांच्या हस्ते पुणेरी पगडी, स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. या वेळी डॉ. पी. एन. राझदान, डॉ. विजय भटकर, डॉ. पी. वेणुगोपाल, पी. डी. पाटील, ॲड. उज्ज्वल निकम, डॉ. नरेंद्र जाधव आदी उपस्थित होते.

# देशाच्या प्रगतीसाठी हवी दूरदृष्टी

## डॉ. कलाम : डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचा पदवीदान समारंभ उत्साहात

**सकाळ वृत्तसेवा**

पिंपरी, ता. १८ : "देशाच्या प्रगतीसाठी 'दूरदृष्टी' असणे महत्त्वाचे आहे. त्यासाठी कठीण परिश्रम, विकासासाठी वयाच्या २८ वर्षांपर्यंत केलेले प्रयत्न, अडचणींवर मात करणे आणि नंतर यश मिळविणे, या गुणांची गरज आहे, असे प्रतिपादन भारतरत्न आणि माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांनी येथे केले.

डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाच्या दुसऱ्या पदवीदान समारंभानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. या वेळी त्रिपुराचे राज्यपाल डॉ. डी. वाय. पाटील, डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलपती पी. डी. पाटील, कुलगुरू डॉ. पी. एन. राझदान, ईटीएच कंपनीचे अध्यक्ष आणि ज्येष्ठ संगणकतज्ज्ञ डॉ. विजय भटकर, अखिल भारतीय वैद्यकीशास्त्र संस्थेचे माजी संचालक डॉ. पी. वेणुगोपाल, विशेष सरकारी वकील ॲड. उज्ज्वल निकम, भारतीय नियोजन मंडळाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव आदी या वेळी उपस्थित होते. या प्रसंगी डॉ. कलाम यांच्या हस्ते डॉ. भटकर आणि डॉ. वेणुगोपाल यांना 'डॉक्टर ऑफ सायन्स', तर डॉ. नरेंद्र जाधव आणि ॲड. उज्ज्वल निकम यांना 'डॉक्टर ऑफ लेटर्स' ही मानद पदवी देऊन सन्मानित करण्यात आले.

पी. डी. पाटील यांच्या हस्ते विद्यापीठाच्या विविध क्षेत्रांत उल्लेखनीय यश मिळविलेल्या विद्यार्थ्यांना पदवी देऊन सन्मानित करण्यात आले. डॉ. कलाम आणि डॉ. डी. वाय. पाटील यांनाही पुणेरी पगडी देऊन सन्मानित करण्यात आले.

डॉ. कलाम म्हणाले, "तुम्ही जेव्हा पदवी घेऊन बाहेर जाल, तेव्हा ज्ञान हाच तुमचा साथीदार असेल. ज्ञान आणि सर्जनशीलता बरोबरीचे आहेत. कारण, शिकण्यामुळे सर्जनशीलता येते. त्यामुळे अशक्य वाटणाऱ्या गोष्टी शोधण्याचे धाडस दाखवावे."

ॲड. निकम म्हणाले, "माझ्या आईला मी डॉक्टर, तर वडिलांना वकील व्हावेसे वाटत होते. अखेर मी वकील झालो. मात्र, आज मला 'डॉक्टर ऑफ लेटर्स' ही पदवी मिळाल्याने मी डॉक्टर झाल्याने आईचेही स्वप्न पूर्ण झाले, या बाबीचा आनंद वाटतो."

डॉ. जाधव म्हणाले, "माझे आई-वडील दोघेही शिकलेले नसल्याने त्यांनी माझ्यावर कोणतीच जबरदस्ती केली नाही. मात्र, माझे वडील सांगायचे, तू कोणाचेही ऐकून डॉक्टर, वकील वगैरे होऊ नकोस. तुला जे वाटते तेच शिक्षण घे; मात्र त्यात नाव कमव. पुण्यातील उदयोन्मुख विद्यापीठाने दिलेली त्यातही डॉ. कलाम यांच्या हस्ते मिळालेली आणि पहिली मानद डॉक्टरेट पदवी असल्याने ही पदवी माझ्यासाठी महत्त्वाची आहे."

डॉ. पी. वेणुगोपाल म्हणाले, "वैद्यकीय क्षेत्रातील डॉक्टरची पदवी घेणारे चांगले माणूस होऊ शकता. विद्यार्थ्यांनी करुणा, शांतता हे गुण अंगी बाणविण्याचा प्रयत्न करावा."

डॉ. भटकर यांचेही या वेळी भाषण झाले.

# NEWS PAPER CLIPINGS

Name of News Paper : Punya Nagar, Pune

Dated: 17/3/2011

# शैक्षणिक संस्था ज्ञानाच्या ऊर्जास्त्रोत : डॉ. कलाम




पिंपरीतील डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाच्या व्दितीय पदवीदान समारंभात माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम, डॉ. विजय भटकर, डॉ. पी. वेणूगोपाल, डॉ. नरेंद्र जाधव तसेच ॲड. उज्वल निकम यांना सन्माननीय डॉक्टरेट प्रदान करून गौरविण्यात आले.

**। पिंपरी/प्रतिनिधी**

२१ व्या शतकात विश्व एक अनेक संधींनी युक्त ज्ञानाधारित समाज बनला आहे. काल ज्य तऱ्हेने काम केले ते आज उपयोगी नाही. शैक्षणिक संस्था ज्ञानाच्या ऊर्जास्त्रोत आहेत, असे मत माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांनी व्यक्त केले. यावेळी ते पुण्याच्या डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाच्या द्वितीय पदवीदान समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

विद्यापीठाचे कुलपती डॉ. पी. डी. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या समारंभात विशेष अतिथी म्हणून संगणकतज्ञ विजय भटकर, अलकेमिस्ट मेडिकल डिव्हिजनचे अध्यक्ष डॉ. पी. वेणुगोपाल, भारत सरकारच्या नियोजन आयोगाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव, विशेष सरकारी वकील उज्वल निकम, कुलगुरू डॉ. पी. एन. राजदान, निबंधक डॉ. बी. एस. माने उपस्थित होते. या सम रंभात डॉ. विजय भटकर आणि डॉ. पी. वेणुगोपाल यांना ▸▸ पान ६ वर

## शैक्षणिक संस्था ज्ञानाच्या ऊर्जास्त्रोत...

तसेच डॉ. नरेंद्र जाधव आणि उज्वल निकम यांना डॉक्टरेट प्रदान करण्यात आली. डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम पुढे म्हणाले, आजचे युग स्पर्धेचे आहे; जे संशोधनावर निर्भर आहे. विद्यापीठांनी एकच ध्येय ठेवावे शिक्षण-संशोधन-शिक्षण, शैक्षणिक संस्था या सृजनतेस अनुकूल आहेत, ज्या गरजेनुसार एकता आणि संवेदनशीलता निर्माण करू शकतात. शिक्षणात मूल्य निर्णय अत्यावश्यक आहे. कारण आज मूल्यच सर्वकाही आहे. मूल्याधारित शिक्षण ही काळाची गरज आहे. डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आणि डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाच्या शिक्षण आणि संशोधन पद्धतीचे कौतुक केले. डॉ. नरेंद्र जाधव म्हणाले की, प्रत्येक व्यक्तीने ती काम करीत असलेल्या ठिकाणी उच्च स्थान मिळविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. उज्वल निकम म्हणाले की, माझ्या आईचे एक स्वप्न होते की मी मोठं झाल्यावर डॉक्टर व्हावं, पण मी नाही होऊ शकलो. मी खूश आहे. कारण आज पुण्याच्या डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाची डॉक्टरेट पदवी प्राप्त झाल्यामुळे माझ्या आईचे स्वप्न आज पुरे झाले आहे. आपल्या देशातील व्यवस्था पूर्णपणे भ्रष्ट झाली आहे आणि आपल्याला ती बदलायची असेल तर ते संसदेतून होणार नाही. त्यासाठी आजच्या युवकांनी पुढे येऊन या व्यवस्थेत बदल करण्यासाठी पाऊल उचलले पाहिजे. आपल्याला दहशदवाद आणि दहशतवादी संपवायचे असतील तर आपल्याला प्रथम या दहशतवाद्यांना मदत करणाऱ्यांना पकडावे लागेल तेव्हाच हा दहशतवाद आपल्या देशातून आणि जगातून संपेल. कुलपती डॉ. पी. डी. पाटील यांनी पदवीदान समारंभात संबोधित केल्यानंतर डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, पुणेचे कुलगुरू डॉ. पी. एन. राजदान यांनी विद्यापीठाचा विशेष अहवाल सादर केला.

# NEWS PAPER CLIPINGS

Name of News Paper : Lokmat

Dated: 17/3/2011

डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचा पदवीदान समारंभ

## व्हिजन २०२०साठी तरुणांची साथ हवी

पिंपरी, दि. १८ (प्रतिनिधी) : प्रत्येकात जग बदलण्याची शक्ती आहे. व्हीजन २०२० हे मिशन एक लढाई आहे. हे स्वप्न साकार करण्यासाठी युवाशक्तीची साथ हवी आहे, अशी साद माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांनी तरूणाईला घातली. मिसाईल मॅनच्या ध्येयवादाने तरूणाईला जिंकले.

संत तुकारामनगर येथे डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाच्या वतीने आयोजित दुसऱ्या पदवीदान समारंभात डॉ. कलाम बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलपती डॉ. पी. डी. पाटील होते. व्यासपीठावर त्रिपुराचे राज्यपाल डॉ. डी. वाय. पाटील, कुलगुरू डॉ. पी. एन. राजदान उपस्थित होते. यावेळी डॉ. कलाम व डॉ. पाटील यांच्या हस्ते संगणकतज्ज्ञ डॉ. विजय भटकर, हृदयशल्यचिकित्सक व 'एम्स'चे माजी संचालक डॉ. पी. वेणूगोपाल, केंद्रीय नियोजन समितीचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव, विशेष सरकारी वकील ॲड. उज्ज्वल निकम यांना डॉक्टरेट प्रदान केली.

फ्रेंडसॅ गुडीइव्हिनींग ऑल ऑफ यू... असे डॉ. कलाम यांनी म्हणताच, सभागृहाने टाळ्यांचा कडकडाट केला. ते म्हणाले, "सर्व क्षेत्रातील पदवीधारकांना शुभेच्छा. विशेष शुभेच्छा डॉ. भटकर, डॉ. वेणूगोपाल, डॉ. जाधव, आणि निकम यांना द्यायला हव्यात. त्यांना डॉक्टरेट प्रदान करताना मला विशेष आनंद होत आहे. मी आज येथे विचार मांडण्यासाठी उभा आहे. तो विचार आहे. अर्थात 'युनीक यू' असे सांगत त्यांनी तरूणाईला प्रश्न केले. हे ज्ञानाचे युग आहे. ज्ञानाधिष्टीत समाज निर्माण करणे गरजेचे आहे. मित्रानो व्हीजन २०२० साठी मी अकरा कोटी तरूणांशी संवाद साधला आहे. तसे पाहिले तर प्रत्येकात जग बदलण्याची, परिवर्तनाची, लढण्याची क्षमता आहे. तीचा आपण शोध घ्यायला हवा. हे आनंदायी मिशन आहे. स्वप्न आहे." हे सांगून त्यांनी मिशन कविता सादर केली. दहा सूत्रे सांगताना डॉ. कलाम म्हणाले, "ग्रामीण शहरातील दरी कमी करायला हवी, त्यासाठी दळणवळणाची साधणे, मुलभूत सुविधा, सिंचनसुविधा, माहितीचा पुल निर्माण करणे, उर्जा स्त्रोतांची निर्मीती, दर्जेदार उच्च शिक्षणाच्या सुविधा, निर्माण करणे गरजेचे आहे. पी. डी. पाटील यांनी प्रास्ताविकात विद्यापीठाच्या कार्याची माहिती दिली. कुलगुरु राजदान यांनी संयोजन केले.

राष्ट्रगीताने पदवीदान समारंभाची सांगता झाली.

# NEWS PAPER CLIPINGS

Name of News Paper : The Indian Express

Dated: 19/3/2011

# Country should focus on self reliance in electricity: Kalam



Kalam at the convocation of DY Patil Vidyapeeth in Pune on Friday EXPRESS PHOTO

EXPRESS NEWS SERVICE

MARCH 18

"EVERY child needs to discover that unique you and nobody should be told to become like others. What worked yesterday will not work today as now we are a knowledge-based society," said APJ Abdul Kalam at the second convocation of DY Patil Vidyapeeth in Pune on Friday.

"The real ingredients of knowledge are creativity, courage and righteousness of the heart. Where there is righteous-

terms of electricity and critical technology.

Public prosecutor DY Patil, Governor of Tripura Vijay Bhatkar, former director Centre for Development of Advanced Computation, P Venugopal chairman, Alchemist Medical Division and former Director of AIIMS, Narendra Jadhav, the member of Planning Commission and former vice-chancellor, UoP, public prosecutor Ujjwal Nikam, Chancellor of DY Patil University, PD Patil, Vice Chancellor P N Razdan were present

*NEWS PAPER CLIPPINGS*

Name of News Paper : अंतरंग

Dated : March 30, 11



# शैक्षणिक संस्था ज्ञानाचा उर्जा स्रोत - डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम

विश्वास रिसबूड

२१ व्या शतकात विश्व एक अनेक संधींनी युक्त ज्ञानाधारित समाज बनला आहे. काल ज्या तऱ्हेने काम केले ते आज उपयोगी नाही. शैक्षणिक संस्था ज्ञानाच्या उर्जा स्रोत आहेत' असे मत माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम व्यक्त केले. पुण्याच्या डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाच्या द्वितीय पदवीदान समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

विद्यापीठाचे कुलपती डॉ. पी. डी. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या समारंभात विशेष अतिथी म्हणून सीडॅकचे माजी संचालक विजय भटकर, अल्केमिस्ट मेडिकल डिव्हीजनचे अध्यक्ष आणि एनआयएमएचएएनएसचे माजी संचालक डॉ. पी. वेणुगोपाल, भारत सरकारच्या नियोजन आयोगाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव, महाराष्ट्र सरकारचे विशेष सरकारी वकील उज्ज्वल निकम, कुलगुरू डॉ. पी. एन. राजदान, निबंधक डॉ. बी. एस. माने उपस्थित होते. या समारंभात डॉक्टर ऑफ सायन्स ही पदवी, डॉ. विजय भटकर आणि डॉ. पी. वेणुगोपाल यांना तसेच डॉक्टर ऑफ लेटर्स ही पदवी डॉ. नरेंद्र जाधव आणि उज्ज्वल निकम यांना प्रदान करण्यात आली.

डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम पुढे म्हणाले, 'आजचे युग स्पर्धेचे युग आहे जे संशोधनावर निर्भर आहे. विद्यापीठांनी एकच ध्येय ठेवावे शिक्षण-संशोधन-शिक्षण. शैक्षणिक संस्था या सृजनतेस अनुकूल आहेत, ज्या गरजेनुसार एकता आणि संवेदनशीलता निर्माण करून शकतात. शिक्षणात मूल्य निर्णय आत्यावश्यक आहे कारण 'आज मूल्यात सर्व काही आहे.' मूल्याधारित शिक्षण ही काळाची गरज आहे. डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आणि डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाच्या शिक्षण आणि संशोधन पद्धतीचे कौतुक केले. डॉ. नरेंद्र जाधव डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाला, त्यांचा केलेला सन्मान आणि डॉक्टरेट दिल्याबद्दल धन्यवाद देत म्हणाले की, मी खूप खुश आहे कारण मला पहिल्यांदा एका प्रतिष्ठीत संस्थेकडून डॉक्टरेट प्राप्त झाली स्पर्धेत मॅरा[illegible] झालीने ती काम करीत तर सिमेन्स कंपनी[illegible] उच्च स्थान मिळविण्याचा या स्पर्धेत राहून सोडा न उज्ज्वल निकम हसत बोलत होता. मैरा पॅटरा [illegible]

हसत म्हणाले की, 'माझ्या आईचे एक स्वप्न होते की मी मोठं झाल्यावर डॉक्टर व्हावं, पण मी नाही होऊ शकलो. मी खुश आहे कारण, आज पुण्याच्या डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाची डॉक्टरेट पदवी प्राप्त झाल्यामुळे माझ्या आईचे स्वप्न आज पुरे होणार आहे. आपल्या देशातील व्यवस्था पूर्णपणे भ्रष्ट झाली आहे आणि आपल्याला जर ती बदलायची असेल तर ते संसदेतून होणार नाही. त्यासाठी आजच्या युवकांनी पुढे येऊन या व्यवस्थेत बदल करण्यासाठी पाऊल उचलले पाहिजे. जर आपल्याला दहशतवाद आणि दहशतवादी संघटनांचे अस्तित्व तर आपल्याला प्रथम या दहशतवाद्यांना मदत करणाऱ्यांना पकडावे लागेल तेव्हाच हा दहशतवाद आपल्या देशातून आणि जगातून संपेल. कुलपती डॉ. पी. डी. पाटील यांनी पदवीदान समारंभात संबोधित केल्यानंतर डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, पुणे चे कुलगुरू डॉ. पी. एन. राजदान यांनी विद्यापीठाचा विशेष अहवाल सादर केला. ■

# Ecology the new dimension of 21st century knowledge society: Kalam

## 'Demand Shifting Towards Technologically Superior Sustainable Systems'

TIMES NEWS NETWORK

**Pune:** Former President APJ Abdul Kalam said on Friday that the new age development model would be a four-dimensional model based on bio-nano-information technologies and ecology, considering the growing global emphasis on the aspect of ecology.

"Globally, the demand is shifting towards development of sustainable systems that are technologically superior. As such, ecology is the new dimension of the 21st century knowledge society, where science and environment will go together," he said, while addressing the second convocation ceremony of the D Y Patil University (DYPU) in Pimpri.

The DYPU, a deemed university, runs a chain of institutions offering undergraduate to postgraduate and doctoral studies in medical, dental and allied health sciences. Former AIIMS director P Venugopal and computer expert Vijay Bhatkar were conferred with honorary degrees of doctor of science, while noted economist and Planning Commission member Narendra Jadhav and special public prosecutor Ujjwal Nikam were presented honorary degrees of doctor of letters, at the ceremony.

During a 30-odd minute speech, Kalam touched upon a range of issues, including convergence of technologies, the need for societal transformation by reaching the unreached.

He also spoke about the significance of integrated action for a developed India.

Kalam highlighted the importance of educational institutions as the powerhouses for knowledge and enablers of intersection of multiple faculties towards achieving mission goals.

Referring to convergence, Kalam said, "Information and communication technologies have already converged leading to ICT, while infotech's convergence with biotechnology has led to bioinformatics. Now, nanotechnology has come in. It is the field of the future, and will replace microelectronics and many fields, with tremendous application potential in areas of medicine, electronics and material science — the use of nanorobots for drug delivery, for instance."

"When nanotechnology and ICT meet, integrated silicon electronics, photonics are born and it can be said that material convergence will happen. With material convergence and biotechnology linked, a new science called intelligent bioscience will be born, which would lead to a disease-free, happy, and more intelligent human habitat, with longevity and high human capabilities," he said.

Kalam said, "Convergence of bio-nano-info technologies can lead to the development of nanorobots, which when injected into a patient, will diagnose and deliver treatment exclusively in the affected area and then the nanorobot will get digested, as it (would be) a DNA-based product."

Founder-head of DYPU and Governor of Tripura D Y Patil was the special guest of honour, while the varsity chancellor P D Patil conferred the degrees on the pass-outs. Vice-chancellor P N Razdan read out the annual report.



Narendra Jadhav receives the honorary D.Litt degree from APJ Abdul Kalam during the convocation ceremony of the DY Patil University on Friday. Also seen are D Y Patil (left) and P D Patil

Times of India
19/3/11

# सन्मानभरारी !

## एअर चीफ मार्शल प्रदीप नाईक यांचा 'महाराष्ट्रभूषण'ने गौरव ■ नाना पाटेकर ठरले 'महाराष्ट्राची शान'

म. टा. प्रतिनिधी ■ मुंबई

हवाईदलाच्या क्षेत्रात मोठ्या कष्टाने उत्तुंग भरारी घेऊन देशाच्या हवाईदलप्रमुखपदापर्यंत मजल मारणारे एअर चीफ मार्शल प्रदीप नाईक हे 'महाराष्ट्र टाइम्स'च्या यंदाच्या 'महाराष्ट्रभूषण'चे मानकरी ठरले आहेत. तर, आपल्या खणखणीत अभिनयाच्या बळावर हिंदी चित्रपटसृष्टी गाजवणारे ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर 'महाराष्ट्राची शान' ठरले आहेत. विलेपार्ले येथील भाईदास सभागृहात शनिवारी संध्याकाळी रंगलेल्या 'राम बंधु मटा सन्मान २०११'च्या दिमाखदार सोहळ्यात या दोघा गौरवमूर्तींना सन्मानित करण्यात आले, तेव्हा संपूर्ण सभागृहाने उभे राहून त्यांच्या कर्तृत्वाला मनापासून सलाम केला.

मराठी सांस्कृतिक विश्वात मानाचे स्थान असलेला 'राम बंधु मटा सन्मान २०११' सोहळा शनिवारी संध्याकाळी साजरा झाला. ग्लॅमरची अवघी दुनिया या सोहळ्यासाठी लोटली होती. सिनेमा, नाटक आणि छोट्या पडद्यावरच्या सेलिब्रेटींनी गर्दी केली होती. विविध क्षेत्रांतील मान्यवरांची उपस्थितीही



लक्षणीय होती. यावेळी केंद्रीय अणुऊर्जा आयोगाचे अध्यक्ष श्रीकुमार बॅनर्जी, नियोजन आयोगाचे सदस्य नरेंद्र जाधव आणि लोकसभेचे माजी अध्यक्ष मनोहर जोशी या त्रयीच्या हस्ते एअरचीफ मार्शल प्रदीप नाईक यांना आणि ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांना ज्येष्ठ दिग्दर्शिका सई परांजपे यांच्या पुरस्कार प्रदान करण्यात आला.

'मी पार्ले टिळक शाळेचा विद्यार्थी; पण मी एअरफोर्समध्ये आल्यानंतर माझा मराठीशी संबंध तुटला. तिथे इंग्रजी आणि हिंदीत संवाद चालतो. त्यामुळे मराठी बोलताना काही चूक झाली तर माफ करा,' अशी प्रस्तावना करीत नाईक यांनी उपस्थितांशी संवाद साधला. 'सैनिकाची आठवण संकटाच्या काळात होते. उरलेल्या काळात आपण त्याला विसरतो. त्याच्या हाती तुमचे भविष्य सुरक्षित आहे. सैनिकाला विसरू नका अशी माझी विनंती आहे,' असे कळकळीचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

'नाईक हे केवळ महाराष्ट्राचे नव्हे, तर अवघ्या देशाचे सुपुत्र आहेत. तरुणांनी स्फूर्ती घ्यावी असे हे व्यक्तिमत्त्व आहे,' अशा शब्दांत बॅनर्जी यांनी नाईक यांचा गौरव केला. ते म्हणाले, 'महाराष्ट्राच्या भूमीत अणुउर्जेच्या प्रगतीचा पाया रचला गेला. भाभा संस्थेसह अनेक महत्त्वाच्या प्रकल्पांमध्ये महाराष्ट्राच्या जनतेचा सहभाग मोठ्या प्रमाणात आहे.' मराठी माणसाचे असे कौतुक करताना बॅनर्जी अणुऊर्जा आयोगाचे माजी अध्यक्ष अनिल काकोडकर यांचे उदाहरण द्यायला विसरले नाहीत.

'एअर चीफ मार्शल नाईक यांचा सन्मान हा शिवाजी महाराजांनी सुरू केलेल्या क्षात्रतेजाचा सन्मान असल्याने त्याचे मनःपूर्वक अभिनंदन करतो,' या शब्दांत नरेंद्र जाधव यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

■ 'वा गुरू' सर्वोत्कृष्ट नाटक ...

महाराष्ट्र टाइम्स 13/3/11

# NEWS PAPER CLIPINGS

Name of News Paper : Sakaal

Dated: 20/3/2011




जळगाव : जगाच्या नकाशावर जळगावचे नाव कोरणारे उद्योगमहर्षी डॉ. भवरलाल जैन यांना शनिवारी महापालिकेतर्फे 'जळगाव रत्न' पुरस्कार प्रदान करताना नियोजन मंडळाचे सदस्य विरोधी पक्षनेते एकनाथराव खडसे, पालकमंत्री गुलाबराव देवकर, खासदार हरिभाऊ जावळे, खासदार ईश्वरलाल जैन, जिल्हा परिषद अध्यक्षा स्मिता वाघ, आमदार सुरेशदादा जैन, आमदार महापालिकेचे विरोधी पक्षनेते गणेश सोनवणे, माजी खासदार डॉ. उल्हास पाटील, भारती जाधव, ॲड. जयप्रकाश बाविस्कर, आमदार गिरीश महाजन, आयुक्त प्रकाश बोखड, आमदार जनता बँकेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. अविनाश आचार्य, आमदार दिलीप सोनवणे, जिल्हा बँकेचे अध्यक्ष डॉ. सतीश पाटील.

# जळगावात भवरलालजींच्या सत्काराला चंद्रही ओणावला!

सकाळ वृत्तसेवा

जळगाव, ता. १९ : सांजवेळी पाना-फुलांनी सजलेले खुले बालगंधर्व नाट्यगृहाचे व्यासपीठ. रोषणाईचा लखलखाट. सजावटीत ठळकपणे उठून दिसणारा भारताचा आणि जगाचा नकाशा. चकाचकीत खुर्च्यांवर विराजमान झालेले मान्यवर. प्रकाशमान झालेल्या समया. या सोहळ्याचा साक्षीदार बनण्यासाठी लोटलेले शहर. तुतारीची ललकार आणि मंत्रोच्चारात, प्रचंड टाळ्यांच्या कडकडाटात आपल्या लाडक्या उत्सवमूर्तीचा सत्कार... एवढे कमी होते म्हणून की काय, या कर्तृत्ववान उत्सवमूर्तीला सलाम करण्यासाठी चक्क चंद्रही ओणावला. तो जवळ आला...! रंगांची उधळण करणाऱ्या होलिकोत्सवाच्या धामधुमीत 'जळगाव रत्न' चमकून गेले. 'जळगाव रत्न' होते अर्थातच जैन उद्योगसमूहाचे संस्थापक अध्यक्ष, विचारवंत डॉ. भवरलालजी जैन!

जैन उद्योगसमूहाद्वारे जळगावचे नाव देशासह सातासमुद्रापार नेणाऱ्या भवरलालजींना जळगाव महापालिकेने 'जळगाव रत्न' पुरस्कार जाहीर केला. पुरस्कार वितरणानिमित्त त्यांना आज नागरी सत्कार आयोजित केला गेला. महापालिकेने अगदी तन-मनाने या कार्यक्रमाची तयारी केली. पुरेपूर जीव ओतला. वातावरणनिर्मिती केली. सत्काराची पुन्हा सांज उगवली आणि खुले बालगंधर्व नाट्यगृहाकडील रस्ते फुलू लागले. तत्पूर्वी नाट्यगृहाचे व्यासपीठ लखलखले होते. मान्यवरांची मांदियाळी होती. त्यात होते दिग्गज दिग्दर्शक, अर्थतज्ज्ञ आणि राजकारणातील 'सहकुटुंब सहपरिवार'. अर्थातच एकही पक्षाचा नेता, पदाधिकारी अपवाद राहिला नाही. स्थानिक पातळीवर आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झाडून राज्यपातळीपर्यंत लक्षवेधी ठरलेले दादा-भाऊ या कार्यक्रमात एकत्र येतील की नाही, अशी कुजबूज होतीच. हे दोघे आले. त्यांनी एकमेकांकडे कटाक्षही टाकला नाही. पण उपस्थितांना जिकले जळगावच्या उद्यमनगरीतील 'पितामह' असलेल्या भवरलालजींच्या प्रेमापोटी

पान २ वर ▶

सविस्तर वृत्त : पान २ ▶

Name of News Paper : ~~Sakaal~~ Loksatta

Dated: 17/3/2011



पिंपरीतील डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचा द्वितीय पदवीप्रदान समारंभात माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या हस्ते डॉ. विजय भटकर, डॉ. वेणुगोपाल, डॉ. नरेंद्र जाधव आणि अ‍ॅड. उज्ज्वल निकम यांना डॉक्टरेट प्रदान करण्यात आली. यावेळी डॉ. डी. वाय. पाटील, डॉ. पी. डी. पाटील आदी उपस्थित होते.

# ज्ञानसंपन्न होऊन राष्ट्राच्या विकासाला योगदान द्या - डॉ. कलाम

## डॉ. भटकर, डॉ. वेणुगोपाल, डॉ. जाधव, अ‍ॅड. निकम यांना डॉक्टरेट

पिंपरी, १८ मार्च / प्रतिनिधी

आजचा समाज ज्ञानाधिष्ठित समाज असून कालच्या संकल्पना आज लागू पडत नाही. काळाची गरज ओळखून ज्ञानसंपन्न होऊन राष्ट्राच्या विकासाला योगदान द्या, असे आवाहन माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांनी पिंपरीत केले.

पिंपरीतील डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाच्या द्वितीय पदवीदान समारंभात डॉ. कलाम यांच्या हस्ते डॉ. विजय भटकर, डॉ. वेणुगोपाल, डॉ. नरेंद्र जाधव आणि अ‍ॅड. उज्ज्वल निकम यांना डॉक्टरेट प्रदान करण्यात आली, तेव्हा ते बोलत होते. संत तुकारामनगर येथे विद्यापीठाच्या प्रांगणात झालेल्या या कार्यक्रमास त्रिपुराचे राज्यपाल डॉ. डी. वाय. पाटील, कुलपती डॉ. पी. डी. पाटील, कुलगुरू डॉ. पी. एन. राजदान, कुलसचिव डॉ. एस. बी. माने आदी उपस्थित होते.

डॉ. कलाम म्हणाले की, आजचे युग स्पर्धेचे युग आहे. विद्यापीठांनी शिक्षण तसेच संशोधनाचे ध्येय ठेवावे. शैक्षणिक संस्था या सृजनतेस अनुकूल आहेत. त्या गरजेनुसार एकता आणि संवेदनशीलता निर्माण करू शकतात. मूल्याधारित शिक्षण ही काळाची गरज आहे. ज्ञान ही संपत्ती आहे, अशी संपत्ती निर्माण करणारी ज्ञानपीठे शक्तिस्थळाच्या रूपाने पुढे येत आहेत. युवकांनी कोणतीही गोष्ट धाडसाने करावी. मी, आपण आणि भारत हे सर्व करू शकतो, असे मनात आणून पाहा, समोरची परिस्थिती नक्कीच बदलेल. जगात प्रत्येक गोष्टीला अमर्याद संधी आहे. गरज आहे ती तुमच्या विचारांची, असे ते म्हणाले. कोणतेही काम करताना कार्याबद्दलच्या आशा जिवंत ठेवा, असे आवाहनही त्यांनी केले.

यावेळी डॉ. नरेंद्र जाधव म्हणाले की, प्रत्येक व्यक्तीने ती काम करीत असलेल्या ठिकाणी उच्च स्थान मिळविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. अ‍ॅड. निकम यांनी, आपल्या देशातील व्यवस्था पूर्ण भ्रष्ट झाली आहे.

आपल्याला ती बदलायची असेल तर आजच्या युवकांनी पुढे येऊन या व्यवस्थेतून बदल करण्यासाठी पाऊल उचलले पाहिजे, असे आवाहन केले.

यावेळी डॉ. कलाम यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला, त्यांच्या यशाचे गमक त्यांना विचारले.

